# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** दौंड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0390 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**29/05/2025 21:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 07/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/04/2025
**Time From (वेळेपासून):** 16:47 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/05/2025 **Time (वेळ):** 20:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 028
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/05/2025 20:14 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** दौड कोर्टाचे जवळील गोलराऊंट सर,सर्कल चौकातील हटेल शिवाई दौंड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** दौंड
**District(State) (जिल्हा(राज्य)):** पुणे ग्रामीण(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमोल गौतम गायकवाड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जिंती ता करमाळा जि सोलापुर,दौंड ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जिंती ता करमाळा जि सोलापुर,दौंड ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8767454979

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश शिवाजी कर्चे वय-36वर्षे पद-पोलीस शिपाई बक्कल नं 2705 | | | 1. दौड पोलीस स्टेशन रासोरटेवाडी ,ताबारामती जिपुणे,दौंड ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी वरिलप्रमाणे असून समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दि.07/04/2025 रोजी दौंड पोलीस ठाणे पुणे ग्रामीण येथील लोकसेवक एपीआय नागनाथ पाटील व त्यांचा रायटर पोलीस अंमलदार यांचे कडून लाच मागणी होत असून त्यांचे विरुध्द तक्रार असल्याचे कळविले. सदर तक्रारीचे अनुषंगाने पुढील कारवाईकरीता मला पोलीस निरीक्षक विजय पवार व पथक तसेच पुणे वनविभाग कार्यालयाकडील पंच साक्षीदार श्री दादासाहेब साहेबराव गव्हाणे पद-कनिष्ठ लिपीक व विनायक बबन ताठे पद- वनरक्षक अशी टीम देणेत आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक पवार यांनी विचारणा केलेवरून मी माझे स्व:हस्ताक्षरातील लेखी तक्रार दोन्ही पंचांचे समक्ष लिहून दिली. ती पुढील प्रमाणे-

" मी वरीलप्रमाणे अर्जदार असून वरिल विषयानुसार तक्रारी अर्ज देतो की, माझ्या विरुध्द दौंड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर 882/2024 कलम 310(2) भारतीय न्याय संहिता कायदयानुसार गुन्हा दाखल असून त्या गुन्हयामध्ये माझी महिंद्रा बोलेरो गाडी नंबर एमएच 42 एएस 6658 ही जप्त आहे. ती गाडी सोडवण्याकरीता मी वकिला मार्फत दौंड न्यायालयात अर्ज केला आहे.

दि.03/04/2025 रोजी माझ्या वकिलाने मला माझी वरिल जप्त गाडी सोडवण्याकरीता पोलीसांचे म्हणणे सादर करण्यासाठीचे दौंड पोलीस स्टेशनचे नावचे पत्र माझ्या ताब्यात दिले होते. त्यावेळी मी वरिल गुन्हयाचे तपास अधिकारी एपीआय पाटील साहेबांना संपर्क केला असता त्यांनी मला दि.05/04/2025 रोजी दौंड पोलीस स्टेशन येथे बोलाविले. दि.05/04/2025 रोजी ते पत्र घेवून मी नागनाथ पाटील यांना दौंड पोलीस स्टेशन येथे जावून भेटलो व सदरचे पत्र मी त्यांचे हातात दिले. त्यावर म्हणणे सादर करण्याकरीताचा मोबदला म्हणून एपीआय पाटील साहेब यांनी मला रु.10,000/- मागितले. त्यावर मी त्यांना माझा गुन्हयात जामीन करण्यासाठी माझा खुप खर्च झाला असून एवढे पैसे मला देणे होणार नाही असे सांगितले. त्यावर त्यांनी तडजोड करून मला रु.5000/- आणण्यास सांगुन त्यांच्या रायटर पोलीसाला बोलावून घेतले व म्हणणे सादर करण्याचा अहवाल तयार करण्यास सांगितले. त्यानंतर एपीआय पाटील साहेब मला बोलले की ते दि.07/04/2025 रोजी कोर्टमध्ये म्हणणे सादर करण्याचा अहवाल सादर करतो. मी माझ्या रायटरला सांगितले आहे, दि.07/04/205 रोजी माझ्या रायटरला भेटून त्याच्याकडे रु.5000/- दया असे एपीआय पाटील साहेबांनी सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो असे बोलून निघून आलो.

एपीआय पाटील मागणी करीत असलेली रु.5000/- ही रक्कम कोणतीही शासकीय फी नसून लाच रक्कम असलेबाबत माझी खात्री झाली आहे. ती त्यांना देण्याची मला इच्छा नाही. तसेच एपीआय पाटील व त्यांचा रायटर व माझेत यापुर्वीचे कोणतेही वाद विवाद नसून आर्थिक व्यवहार झालेले नाहीत. तरी एपीआय नागनाथ पाटील व त्यांचा रायटर पोलीस अंमलदार यांचे विरुध्द आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे."

वरिल प्रमाणे लेखी तक्रार दिलेनंतर पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करणेत येणा-या पडताळणी व सापळा कारवाईबाबत मला माहिती दिली. त्यानंतर वरिल नमूद लोकसेवकांची माझेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरवून पोनि पवार यांनी मला नमूद लोकसेवक यांना कधी व कुठे भेटण्यास बोलावले आहे? अशी विचारणा केली असता मी एपीआय पाटील यांचे रायटर पोलीस अंमलदार हे दौंड कोर्टमध्ये असून सदर कोर्टाचे परिसरामध्ये दुपार नंतर भेटणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्व ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथुन सुमारे 14.30 वा. निघून पुणे सोलापुर हायवे मार्गे पाटस दौंड रोडने रोडलगत पोतदार शाळेच्या बाजुस असलेल्या महालक्ष्मी प्लॉटींग या ठिकाणी 16.20 वाजता पोहचलो. पोनि पवार यांनी मला, पंचांना व सापळा पथकास पडताळणी कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सुचन देवून प्रथम माझे व पंच श्री गव्हाणे यांचे पडताळणी निवेदन 16.37 वाजता व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर 16.47 वाजता व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो मला लावला व पंच क्र.1 श्री गव्हाणे यांचेसोबत दौंड कोर्टाचे काही अंतर पुर्वी

शासकीय वाहनाने सोडले. तेथून मी व पंच क्र.1 असे दौंड कोर्टाचे परिसरामध्ये पायी चालत जावून आधी माझ्या वकीलाची भेट घेतली व त्यानंतर लोकसेवक एपीआय पाटील यांचे रायटर पोलीस अंमलदार यांना फोन केला असता ते काही वेळात आम्ही कोर्टाचे गेटचे बाहेर थांबलेल्या ठिकाणी आले. ते, मी व पंच क्र.1 असे त्यांच्या दुचाकी वाहनाने कोर्टाचे जवळील गोल राऊंड चौकातील हॉटेल शिवाई येथे चहा पिण्यासाठी गेलो.
सदर ठिकाणी मी व माझे बाजुस रायटर पोलीस अंमलदार व आमचे समोर सुमारे अडीच फुट अंतरावर पंच श्री घाणे असे उभा असताना आमचेत माझी दौंड पोस्टे येथील गुन्हयात असलेली जप्त गाडी सोडणेबाबत मा. दौंड कोर्टाकडून पोलीसांचा मागविण्यात आलेल्या अहवालाबाबत चर्चा झाली त्या दरम्यान लोकसेवक रायटर पोलीस अंमलदार माझे कानामध्ये हळु आवाजामध्ये मला "साहेबांच अण आमच काय असल ते करून टाका" असे बोलले त्यावर मी त्यांना "बस उगाच पाच हजार रुपये तसला विषय घ्यायचा नाय मला तुमच्या पाया पडतो, मला खर्च मरानाचा आहे मी व्याकुळून गेलो आहे" असे बोललो ते माझ्या कानात हळु आवाजात "पाच पर्यंत म्हणता" असे बोलले त्यावर मी त्यांना "आ" असे विचारले असता ते पुन्हा हळु आवाजात माझे कानामध्ये "पाच पर्यंत म्हणताय का" असे बोलले त्यावर मी "आं" असे विचारले असता थोडा वेळ थांबुन ते माझ्या कानामध्ये हळु आवाजात "दहा" असे बोलले त्यावर मी त्यांना "दहा हजार असत्यात...ओ साहेब धन्यय तुमच्या पाया पडतो, माझी लय परिस्थीती वाईट आहे तुम्हाला मी तीन हजार रुपये बघुन देतो तासाभरात आणि दोन हजार गाडी सुटताना तुमच्यापाशी आणुन देतो असे बोललो असता आमचेत थोडीशी आणखी चर्चा होवून रायटर पोलीस अंमलदार माझे कानामध्ये हळु आवाजात "सगळच करून टाका डायरेक्ट" असे मला बोलले असता मी त्यांना सगळच नाय साहेब तुमच्या पाया पडु का आता असे बोलुन पंच व मी निघुन आलो. एकंदरीत झालेल्या पडताळणीमध्ये एपीआय पाटील साहेबांचे रायरटर पोलीस अंमलदार यांनी त्यांचे स्वत: व एपीआय पाटील यांचेकरीता माझेकडे 10,000/- रुपये पैशाची मागणी करून तडजोडी अंति रु.5000/-पैशाची मागणी केली व सदर रकमेपैकी रु.3000/- पुढील तासाभरात व उर्वरित रु.2000/- जप्त वाहन सोडतेवेळी घेण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर पोनि पवार यांनी माझेकडे एपीआय पाटील यांचे पडताळणीबाबत विचारणा करता मी सांगितले की, एपीआय पाटील यांचा नक्की ठावठिकाणा माहित नसल्याने त्यांचेकडे फोनद्वारे पडताळणी करावी. त्याप्रमाणे मी शासकीय वाहनामध्ये बसून माझे मोबा.क्र.8788318504 वरून एपीआय पाटील यांचे मोबा.क्र.7517892674 वर स्पीकर ऑन करून फोन लावला असता संपर्क झाला. मी एपीआय पाटील साहेबांना त्या दिवशी आपले पाच हजार रुपये ठरले होते माझ्या जवळ पाच हजार नाहीत तीन हजार आहेत असे बोललो असता त्यांनी कोणी सांगितले असे मला विचारले त्यावेळी मी त्यांना तुमच्या हाताखालच्या रायटरने सांगितले असे बोललो असता त्यांनी "मी पैसे-बियसे घेत नाही कोणाला एक रुपया दयायचा नाही" असे बोलून माझ्याकडे लाचेची मागणी केली नाही व फोन कट केला. त्यानंतर लगेच एपीआय पाटील यांनी त्यांचे वरिल नमूद मोबा.क्रमांकावरून माझे वरिल नमूद मोबाईल क्रमांकावर फोन केला व एपीआय पाटील यांनी मला सांगितले की, "त्यांनी त्यांच्या रायटरला विचारल त्यांन तुला (मला) काय पैसे मागितले नाय. कोणालाही पैसे देवू नको तुझा से दुपारी कोर्टात नेहून दिला आहे" असे मला बोलून फोन कट केला. सदरचे दोन्ही कॉल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करणेत आले आहेत.
त्यानंतर पोनि पवार यांनी मला एपीआय पाटील यांचे रायटर पोलीस अंमलदार यांचेकडे पुढील सापळा कारवाई करणेबाबत विचारणा केली असता एपीआय पाटील यांचे नुकतेच त्यांचे रायटरशी बोलणे झालेबाबत सांगितले आहे. त्यामुळे त्यांना संशय येवून लाच रक्कम स्वीकारली जाणार नाही. तसेच एपीआय पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे से कोर्टात दाखल झाला असल्याने माझी गाडी सोडतेवेळी लाच रक्कम स्वीकारण्याची शक्यता असल्याने त्यावेळी सापळा कारवाई करण्यात यावी असे बोलून माझ्या विनंती वरून दि.07/04/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करणेत आली.
त्यानंतर माझी गुन्हयातील जप्त गाडी परत मिळणेबाबतचा अर्ज मा. दौंड कोर्टाने नामंजुर केल्याने मी वकिलामार्फत मा.बारामती सत्र न्यायालयात अपिल अर्ज सादर केला असता मा. न्यायालयाने तो मान्य करून माझी जप्त गाडी सोडणेबाबत आदेश मला दि.07/05/2025 रोजी प्राप्त झाला. त्याबाबत पोनि पवार यांना संपर्क करून मी दि. 8/5/2025 रोजी सदर कोर्टाकडील आदेश घेवून दौंड पोलीस स्टेशन येथे जावून एपीआय पाटील यांचे रायटरची भेट घेणार आहे. त्यावेळी पुढील सापळा कारवाई करावी अशी विनंती केल्याने दि.08/05/2025 रोजी पोनि पवार हे सापळा पथकासह मला एसआरपीएफ ग्रुप क्र.7 परिसरामध्ये श्री म्हसोबा मंदिराचे समोर झाडाखाली येवून भेटले. पोनि पवार यांनी दोन्ही पंच, सापळा पथक व मला सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व दोन्ही पंच साक्षीदार यांना अँथ्रासिन पावडरचे अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामधील निळसर चकाकीचे गुणधर्म समजावून सांगुन त्याची प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यानंतर मी सादर केलेल्या रु.3000/- (भारतीय चलनातील रु.500/- दराच्या 6 नोटा) नोटांना अँथ्रासिन पावडर लावून त्या मी परिधान केलेल्या शर्टचे

पुढील डाव्या बाजुस असलेल्या खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर माझे व पंच श्री गव्हाणे अशी आमची सापळा नियोजन ध्वनिमुद्रीत करून आम्हाला सापळ्याचे नियोजन समजावून सांगुन मला व्हॉईस रेकॉर्डरसह पंच गव्हाणे यांचेसोबत 14.02 वाजता रवाना केले. आम्ही दौंड पोस्टे गेलो व एपीआय पाटील यांचे कक्षाचे बाहेर थांबलो असता तो बंद होता. त्यावेळी मला तेथील इतर पोलीस अंमलदारांनी हटकले असता मी त्यांना "पाटील साहेबांकड आलो होतो. त्यांचे हाताखालच्याचे (रायटरचे)नाव काय आहे" अशी विचारणा करता त्यांचेकडून एपीआय पाटील साहेबांच्या रायटरचे नाव "कर्चे" असल्याचे मला समजले व ते जेवायले गेले असून येतील थोडया वेळाने असे नमूद पोलीस अंमलदार यांनी सांगितले. त्यामुळे मी व पंच असे परत आलो.
त्यानंतर पुन्हा 16.01 वाजता मला व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्र.1 गव्हाणे यांचेसोबत दौंड पोस्टे येथे रवाना केले. आम्ही दौंड पोस्टे येथे पोहचून एपीआय पाटील यांचे कक्षाचे बाहेर थांबलो असता तो बंदच होता. त्यामुळे मी तेथील इतर पोलीस अंमलदार यांचेकडे चौकशी केली असता रायटर पोलीस कर्चे पाच-साडेपाच नंतर येतील अशी माहीती मला मिळाल्याने मी व पंच असे नियोजित थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर मी रायटर कर्चे यांना फोन लावून त्यांचे ठावठिकाण्याची माहिती घेतो असे बोललो असता आम्ही सरकारी वाहनामध्ये बसून मी दोन्ही पंचा समक्ष माझे मोबा.क्र. 8767454979 वरून रायटर पोलीस कर्चे यांचे मोबा.क्र. 9561654505 वर फोन लावला असता संपर्क झाला. त्यावेळी मी त्यांना "माझी गाडी सोडबाबतचा बारामती कोर्टाकडील आदेश मला मिळाल्याचे सांगितले असता" त्यांनी बर ठिकय असे बोलून फोन कट केला. अपुरे बोलणे झाल्याने मी त्यांना पुन्हा फोन केला असता त्यांनी फोन कट केला सदरचे दोन्ही कॉल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करणेत आले आहेत. रायटर पोलीस कर्चे यांना संशय आला असावा असे मला वाटत असल्याने मी पोनि पवार यांना सापळा कारवाई स्थगित करण्याची विनंती केली त्यावरून दि.08/5/2025 रोजीची सापळा कारवाई स्थगित करून पोनि पवार व त्यांचे पथक परत गेले. त्यानंतर मी दौड पोलीस स्टेशन येथे जावून पोलीस निरीक्षक यांची भेट घेवून माझेकडील बारामती कोर्टाचे आदेशाची प्रत दाखवली असता सदर आदेशाची पाहणी करून त्यांनी माझी गाडी सोडणेबाबत त्यांचे महिला पोलीस अंमलदार यांना सांगितले असता नमूद महिला पोलीस अंमलदार यांनी योग्य ती प्रक्रिया करून माझी कुरकुंभ पोलीस चौकी येथे उभी असलेली गाडी ताब्यात घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी कुरकुंभ पोलीस चौकी येथे जावून रात्री उशिरा माझी गाडी ताब्यात भाग 5गु.रजि नं 390/2025 भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम 7,7(A)
फिर्यादी-अमोल गौतम गायकवाड वय 40 वर्षे व्यवसाय - मजुरी रा. जिंती ता. करमाळा जि. सोलापुर मोबा.क्र. 8767454979/ 8788318504.
आरोपी- रमेश शिवाजी कर्चे वय-36वर्षे व्यवसाय- नोकरी, पद-पोलीस शिपाई बक्कल नं 2705 नेमणुक-दौड पोलीस स्टेशन रा.सोरटेवाडी ता.बारामती जि.पुणे मो नं 9561654505
गु.घ.ता वेळ व ठिकाण- दि.07/04/2025 रोजीचे 16.47 ते 17.43वाजता.चे दरम्यान दौड कोर्टाचे जवळील गोलराऊंट सर्कल चौकातील हॉटेल शिवाई दौंड ता.दौड जि.पुणे येथे
हकिकत-
मी वरिलप्रमाणे असून समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दि.07/04/2025 रोजी दौंड पोलीस ठाणे पुणे ग्रामीण येथील लोकसेवक एपीआय नागनाथ पाटील व त्यांचा रायटर पोलीस अंमलदार यांचे कडून लाच मागणी होत असून त्यांचे विरुध्द तक्रार असल्याचे कळविले. सदर तक्रारारीचे अनुषंगाने पुढील कारवाईकरीता मला पोलीस निरीक्षक विजय पवार व पथक तसेच पुणे वनविभाग कार्यालयाकडील पंच साक्षीदार श्री दादासाहेब साहेबराव गव्हाणे पद-कनिष्ठ लिपीक व विनायक बबन ताठे पद- वनरक्षक अशी टीम देणेत आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक पवार यांनी विचारणा केलेवरून मी माझे स्व:हस्ताक्षरातील लेखी तक्रार दोन्ही पंचांचे समक्ष लिहून दिली. ती पुढील प्रमाणे-
" मी वरीलप्रमाणे अर्जदार असून वरिल विषयानुसार तक्रारी अर्ज देतो की, माझ्या विरुध्द दौंड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर 882/2024 कलम 310(2) भारतीय न्याय संहिता कायदयानुसार गुन्हा दाखल असून त्या गुन्हयामध्ये माझी महिंद्रा बोलेरो गाडी नंबर एमएच 42 एएस 6658 ही जप्त आहे. ती गाडी सोडवण्याकरीता मी वकिला मार्फत दौंड न्यायालयात अर्ज केला आहे.
दि.03/04/2025 रोजी माझ्या वकिलाने मला माझी वरिल जप्त गाडी सोडवण्याकरीता पोलीसांचे म्हणणे सादर करण्यासाठीचे दौंड पोलीस स्टेशनचे नावचे पत्र माझ्या ताब्यात दिले होते. त्यावेळी मी वरिल गुन्हयाचे तपास अधिकारी एपीआय पाटील साहेबांना संपर्क केला असता त्यांनी मला दि.05/04/2025 रोजी दौंड पोलीस स्टेशन येथे बोलाविले. दि.05/04/2025 रोजी ते पत्र घेवून मी नागनाथ पाटील यांना दौंड पोलीस स्टेशन येथे जावून भेटलो व सदरचे पत्र मी त्यांचे हातात दिले. त्यावर म्हणणे सादर करण्याकरीताचा मोबदला म्हणून एपीआय पाटील साहेब यांनी मला रु.10,000/- मागितले. त्यावर मी त्यांना माझा गुन्हयात जामीन करण्यासाठी माझा खुप खर्च

झाला असून एवढे पैसे मला देणे होणार नाही असे सांगितले. त्यावर त्यांनी तडजोड करून मला रु.5000/- आणण्यास सांगुन त्यांच्या रायटर पोलीसाला बोलावून घेतले व म्हणणे सादर करण्याचा अहवाल तयार करण्यास सांगितले. त्यानंतर एपीआय पाटील साहेब मला बोलले की ते दि.07/04/2025 रोजी कोर्टामध्ये म्हणणे सादर करण्याचा अहवाल सादर करतो. मी माझ्या रायटरला सांगितले आहे, दि.07/04/205 रोजी माझ्या रायटरला भेटून त्याच्याकडे रु.5000/- दया असे एपीआय पाटील साहेबांनी सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो असे बोलून निघून आलो.

एपीआय पाटील मागणी करीत असलेली रु.5000/- ही रक्कम कोणतीही शासकीय फी नसून लाच रक्कम असलेबाबत माझी खात्री झाली आहे. ती त्यांना देण्याची मला इच्छा नाही. तसेच एपीआय पाटील व त्यांचा रायटर व माझेत यापुर्वीचे कोणतेही वाद विवाद नसून आर्थिक व्यवहार झालेले नाहीत. तरी एपीआय नागनाथ पाटील व त्यांचा रायटर पोलीस अंमलदार यांचे विरुध्द आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे."

वरिल प्रमाणे लेखी तक्रार दिलेनंतर पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करणेत येणा-या पडताळणी व सापळा कारवाईबाबत मला माहिती दिली. त्यानंतर वरिल नमूद लोकसेवकांची माझेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरवून पोनि पवार यांनी मला नमूद लोकसेवक यांना कधी व कुठे भेटण्यास बोलावले आहे? अशी विचारणा केली असता मी एपीआय पाटील यांचे रायटर पोलीस अंमलदार हे दौंड कोर्टामध्ये असून सदर कोर्टाचे परिसरामध्ये दुपार नंतर भेटणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्व ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथुन सुमारे 14.30 वा. निघून पुणे सोलापुर हायवे मार्गे पाटस दौंड रोडने रोडलगत पोतदार शाळेच्या बाजुस असलेल्या महालक्ष्मी प्लॉटींग या ठिकाणी 16.20 वाजता पोहचलो. पोनि पवार यांनी मला, पंचांना व सापळा पथकास पडताळणी कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सुचन देवून प्रथम माझे व पंच श्री गव्हाणे यांचे पडताळणी निवेदन 16.37 वाजता व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर 16.47 वाजता व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो मला लावला व पंच क्र.1 श्री गव्हाणे यांचेसोबत दौंड कोर्टाचे काही अंतर पुर्वी शासकीय वाहनाने सोडले. तेथून मी व पंच क्र.1 असे दौंड कोर्टाचे परिसरामध्ये पायी चालत जावून आधी माझ्या वकीलाची भेट घेतली व त्यानंतर लोकसेवक एपीआय पाटील यांचे रायटर पोलीस अंमलदार यांना फोन केला असता ते काही वेळात आम्ही कोर्टाचे गेटचे बाहेर थांबलेल्या ठिकाणी आले. ते, मी व पंच क्र.1 असे त्यांच्या दुचाकी वाहनाने कोर्टाचे जवळील गोल राऊंड चौकातील हॉटेल शिवाई येथे चहा पिण्यासाठी गेलो.

सदर ठिकाणी मी व माझे बाजुस रायटर पोलीस अंमलदार व आमचे समोर सुमारे अडीच फुट अंतरावर पंच श्री गव्हाणे असे उभा असताना आमचेत माझी दौंड पोस्टे येथील गुन्हयात असलेली जप्त गाडी सोडणेबाबत मा. दौंड कोर्टाकडून पोलीसांचा मागविण्यात आलेल्या अहवालाबाबत चर्चा झाली त्या दरम्यान लोकसेवक रायटर पोलीस अंमलदार माझे कानामध्ये हळु आवाजामध्ये मला "साहेबांच अण आमच काय असल ते करून टाका" असे बोलले त्यावर मी त्यांना "बस उगाच पाच हजार रुपये तसला विषय घ्यायचा नाय मला तुमच्या पाया पडतो, मला खर्च मरानाचा आहे मी व्याकुळून गेलो आहे" असे बोललो ते माझ्या कानात हळु आवाजात "पाच पर्यंत म्हणता" असे बोलले त्यावर मी त्यांना "आ" असे विचारले असता ते पुन्हा हळु आवाजात माझे कानामध्ये "पाच पर्यंत म्हणताय का" असे बोलले त्यावर मी "आं" असे विचारले असता थोडा वेळ थांबुन ते माझ्या कानामध्ये हळु आवाजात "दहा" असे बोलले त्यावर मी त्यांना "दहा हजार असत्यात...ओ साहेब धन्यय तुमच्या पाया पडतो, माझी लय परिस्थीती वाईट आहे तुम्हाला मी तीन हजार रुपये बघुन देतो तासाभरात आणि दोन हजार गाडी सुटताना तुमच्यापाशी आणुन देतो असे बोललो असता आमचेत थोडीशी आणखी चर्चा होवून रायटर पोलीस अंमलदार माझे कानामध्ये हळु आवाजात "सगळच करून टाका डायरेक्ट" असे मला बोलले असता मी त्यांना सगळच नाय साहेब तुमच्या पाया पडु का आता असे बोलुन पंच व मी निघुन आलो. एकंदरीत झालेल्या पडताळणीमध्ये एपीआय पाटील साहेबांचे रायरटर पोलीस अंमलदार यांनी त्यांचे स्वत: व एपीआय पाटील यांचेकरीता माझेकडे 10,000/- रुपये पैशाची मागणी करून तडजोडी अंति रु.5000/-पैशाची मागणी केली व सदर रकमेपैकी रु.3000/- पुढील तासाभरात व उर्वरित रु.2000/- जप्त वाहन सोडतेवेळी घेण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पोनि पवार यांनी माझेकडे एपीआय पाटील यांचे पडताळणीबाबत विचारणा करता मी सांगितले की, एपीआय पाटील यांचा नक्की ठावठिकाणा माहित नसल्याने त्यांचेकडे फोनद्वारे पडताळणी करावी. त्याप्रमाणे मी शासकीय वाहनामध्ये बसून माझे मोबा.क्र.8788318504 वरून एपीआय पाटील यांचे मोबा.क्र.7517892674 वर स्पीकर ऑन करून फोन लावला असता संपर्क झाला. मी एपीआय पाटील साहेबांना त्या दिवशी आपले पाच हजार रुपये ठरले होते माझ्या जवळ पाच हजार नाहीत तीन हजार आहेत असे बोललो असता त्यांनी कोणी सांगितले असे मला विचारले त्यावेळी मी त्यांना तुमच्या हाताखालच्या रायटरने सांगितले असे बोललो असता त्यांनी "मी पैसे-बियसे घेत नाही कोणाला एक रुपया दयायचा नाही" असे बोलून माझ्याकडे लाचेची मागणी केली नाही व फोन कट

केला. त्यानंतर लगेच एपीआय पाटील यांनी त्यांचे वरिल नमूद मोबा.क्रमांकावरून माझे वरिल नमूद मोबाईल क्रमांकावर फोन केला व एपीआय पाटील यांनी मला सांगितले की, "त्यांनी त्यांच्या रायटरला विचारल त्यांन तुला (मला) काय पैसे मागितले नाय. कोणालाही पैसे देवू नको तुझा से दुपारी कोर्टात नेहून दिला आहे" असे मला बोलून फोन कट केला. सदरचे दोन्ही कॉल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करणेत आले आहेत.
त्यानंतर पोनि पवार यांनी मला एपीआय पाटील यांचे रायटर पोलीस अंमलदार यांचेकडे पुढील सापळा कारवाई करणेबाबत विचारणा केली असता एपीआय पाटील यांचे नुकतेच त्यांचे रायटरशी बोलणे झालेबाबत सांगितले आहे. त्यामुळे त्यांना संशय येवून लाच रक्कम स्वीकारली जाणार नाही. तसेच एपीआय पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे से कोर्टात दाखल झाला असल्याने माझी गाडी सोडतेवेळी लाच रक्कम स्वीकारण्याची शक्यता असल्याने त्यावेळी सापळा कारवाई करण्यात यावी असे बोलून माझ्या विनंती वरून दि.07/04/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करणेत आली.
त्यानंतर माझी गुन्हयातील जप्त गाडी परत मिळणेबाबतचा अर्ज मा. दौंड कोर्टाने नामंजुर केल्याने मी वकिलामार्फत मा.बारामती सत्र न्यायालयात अपिल अर्ज सादर केला असता मा. न्यायालयाने तो मान्य करून माझी जप्त गाडी सोडणेबाबत आदेश मला दि.07/05/2025 रोजी प्राप्त झाला. त्याबाबत पोनि पवार यांना संपर्क करून मी दि. 8/5/2025 रोजी सदर कोर्टाकडील आदेश घेवून दौंड पोलीस स्टेशन येथे जावून एपीआय पाटील यांचे रायटरची भेट घेणार आहे. त्यावेळी पुढील सापळा कारवाई करावी अशी विनंती केल्याने दि.08/05/2025 रोजी पोनि पवार हे सापळा पथकासह मला एसआरपीएफ ग्रुप क्र.7 परिसरामध्ये श्री म्हसोबा मंदिराचे समोर झाडाखाली येवून भेटले. पोनि पवार यांनी दोन्ही पंच, सापळा पथक व मला सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व दोन्ही पंच साक्षीदार यांना अँथ्रासिन पावडरचे अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामधील निळसर चकाकीचे गुणधर्म समजावून सांगुन त्याची प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यानंतर मी सादर केलेल्या रु.3000/- (भारतीय चलनातील रु.500/- दराच्या 6 नोटा) नोटांना अँथ्रासिन पावडर लावून त्या मी परिधान केलेल्या शर्टचे पुढील डाव्या बाजुस असलेल्या खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर माझे व पंच श्री गव्हाणे अशी आमची सापळा निवेदने ध्वनिमुद्रीत करून आम्हाला सापळ्याचे नियोजन समजावून सांगुन मला व्हॉईस रेकॉर्डरसह पंच गव्हाणे यांचेसोबत 14.02 वाजता रवाना केले. आम्ही दौंड पोस्टे गेलो व एपीआय पाटील यांचे कक्षाचे बाहेर थांबलो असता तो बंद होता. त्यावेळी मला तेथील इतर पोलीस अंमलदारांनी हटकले असता मी त्यांना "पाटील साहेबांकड आलो होतो. त्यांचे हाताखालच्याचे (रायटरचे)नाव काय आहे" अशी विचारणा करता त्यांचेकडून एपीआय पाटील साहेबांच्या रायटरचे नाव "कर्चे" असल्याचे मला समजले व ते जेवायले गेले असून येतील थोडया वेळाने असे नमूद पोलीस अंमलदार यांनी सांगितले. त्यामुळे मी व पंच असे परत आलो.
त्यानंतर पुन्हा 16.01 वाजता मला व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्र.1 गव्हाणे यांचेसोबत दौंड पोस्टे येथे रवाना केले. आम्ही दौंड पोस्टे येथे पोहचून एपीआय पाटील यांचे कक्षाचे बाहेर थांबलो असता तो बंदच होता. त्यामुळे मी तेथील इतर पोलीस अंमलदार यांचेकडे चौकशी केली असता रायटर पोलीस कर्चे पाच-साडेपाच नंतर येतील अशी माहीती मला मिळाल्याने मी व पंच असे नियोजित थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर मी रायटर कर्चे यांना फोन लावून त्यांचे ठावठिकाण्याची माहिती घेतो असे बोललो असता आम्ही सरकारी वाहनामध्ये बसून मी दोन्ही पंचा समक्ष माझे मोबा.क्र. 8767454979 वरून रायटर पोलीस कर्चे यांचे मोबा.क्र. 9561654505 वर फोन लावला असता संपर्क झाला. त्यावेळी मी त्यांना "माझी गाडी सोडबाबतचा बारामती कोर्टाकडील आदेश मला मिळाल्याचे सांगितले असता" त्यांनी बर ठिकय असे बोलून फोन कट केला. अपुरे बोलणे झाल्याने मी त्यांना पुन्हा फोन केला असता त्यांनी फोन कट केला सदरचे दोन्ही कॉल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करणेत आले आहेत. रायटर पोलीस कर्चे यांना संशय आला असावा असे मला वाटत असल्याने मी पोनि पवार यांना सापळा कारवाई स्थगित करण्याची विनंती केली त्यावरून दि.08/5/2025 रोजीची सापळा कारवाई स्थगित करून पोनि पवार व त्यांचे पथक परत गेले. त्यानंतर मी दौड पोलीस स्टेशन येथे जावून पोलीस निरीक्षक यांची भेट घेवून माझेकडील बारामती कोर्टाचे आदेशाची प्रत दाखवली असता सदर आदेशाची पाहणी करून त्यांनी माझी गाडी सोडणेबाबत त्यांचे महिला पोलीस अंमलदार यांना सांगितले असता नमूद महिला पोलीस अंमलदार यांनी योग्य ती प्रक्रिया करून माझी कुरकुंभ पोलीस चौकी येथे उभी असलेली गाडी ताब्यात घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी कुरकुंभ पोलीस चौकी येथे जावून रात्री उशिरा माझी गाडी ताब्यात घेतली.
त्यानंतर आज दि.09/05/2025 रोजी पोनि पवार यांनी माझी दोन पंच व सापळा पथकासह भेट घेवून पुढील सापळा कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना सांगितले की, माझी गाडी मला परत मिळाली आहे त्यामुळे रायटर पोलीस अंमलदार कर्चे हे आता माझ्याकडून लाच रक्कम स्वीकारतील असे मला वाटत नाही. त्याबाबत मी आज पर्यंत वाट पाहीली. तसेच माझी गाडी सोडविल्यानंतर माझ्या विरुध्द दाखल गुन्हयाचे कामी मी दौंड पोस्टे येथे

गेलो असता रायटर कर्चे यांचे पुर्ण नाव श्री रमेश शिवाजी कर्चे, पोशिक्र.2705 नेमुणक- दौंड पोस्टे असे असल्याचे मला समजले आहे.
तरी मी दि.07/04/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंकधक विभागास दिलेल्या तक्रारदारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कडून दि.07/04/2025 रोजी 16.47 ते 17.43 वाजता दरम्यान दौंड कोर्टाचे जवळील गोलराऊंड सर्कल चौकातील हॉटेल शिवाई येथे झालेल्या पडताळणी कारवाईमध्ये दौंड पोलीस ठाणे येथील एपीआय पाटील यांचे रायटर लोकसेवक पोलीस शिपाई श्री रमेश शिवाजी कर्चे पोशि क्र.2705 नेमणुक दौड पोस्टे यांनी माझी दौंड पोस्टे गुन्हयात जप्त असलेली गाडी परत मिळणेबाबत मी मा. दौंड कोर्टाकडे सादर केलेल्या अर्जावरून मा. दौंड कोर्टाने तपासी अधिकारी एपीआय पाटील यांना पोलीसांचे म्हणणे (आय ओ टु से ) सादर करणेबाबत आदेशित केले असता सदर पोलीसांचे म्हणणे मा. कोर्टात सादर करणेकरीताचा मोबदला म्हणून रायटर कर्चे यांनी त्यांचे स्वत:साठी व एपीआय पाटील यांचे करीता प्रथम 10,000/- रुपयांची मागणी करून तडजोडी अंती 5,000 /- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.
दाखल अधिकारी-पोलीस उपनिरीक्षक ब्रिदी
तपास अधिकारी- श्री विजय पवार, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

GOPAL BASU PAWAR(I (Inspector)) / PBMAH79241 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

PSI

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): GOPAL BASU PAWA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMAH79241